**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११०१८.**

**मा.विधी समिती**

**कार्यपत्रिका क्रमांक - २२**

**सभावृत्तांत**

**दिनांक - १८/१०/२०२१** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माविधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक ०१/१०/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात माउपसचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व दिनांक २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पद्धतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) तसेच मा. कक्ष अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक - आव्यप्र-२०२०/प्र.क्र.२२५/आव्यप्र-१ दिनांक १७/९/२०२१ अन्वये सभागृहातील आसन क्षमतेच्या ५०% प्रमाणे सदस्यांचे उपस्थितीत आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे काही सन्मा.सदस्य सभागृहात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

१. **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती**
२. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३. मा.सुजाता सुनिल पालांडे
४. मा.चौगुले सीमा दत्तात्रय
५. मा.गोफणे अनुराधा देविदास
६. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.राजेश आगळे - सहाय्यक आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) प्रभाग क्र.२८ पिंपळे सौदागर येथील पवनानदीकाठी कचरा संकलन केंद्र विकसीत करणे (नि.नो.क्र.३३/०६/२०१९-२०) या कामातून त्याच प्रभागातील आरक्षण क्र.३६७अ खेळाचे मैदान येथे स्वच्छतागृह बांधणे व इतर आवश्यक स्थापत्य विषयक कामे करणेच्या स्थळ बदलाबाबतच्या प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत.

----------

मा.विधी समिती सभा **(कार्यपत्रिका क्र.२१)** दि.०१/१०/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ६३ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १८/१०/२०२१ विभाग - प्रशासन

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.अनुराधा गोफणे

संदर्भ -मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/२/कावि/८६४/२०२१, दि.२२/०७/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर **'कार्यकारी अभियंता (स्था)'** अभिनामाची २४ पदे **एस - २३ वेतनश्रेणी ६७७०० - २०८७००** मध्ये शासन मंजूर असून पदोन्नती करीता ५ पदे रिक्त आहेत. **'कार्यकारी अभियंता (स्था)'** अभिनामाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्त सो. यांच्या अध्यक्षतेखाली पदोन्नती समिती सभा दिनांक १२/०७/२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व **'कार्यकारी अभियंता (स्था)'** पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व, संगणक अर्हता आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवाविषयक तपशिल पडताळून, खालील **उपअभियंता (स्था)** यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन व शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ चे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार **'कार्यकारी अभियंता (स्था)'** पदावर **एस - २३ वेतनश्रेणी ६७७०० - २०८७००** या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार तसेच मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

| **अ.क्र** | **उपअभियंता नावं** | **पदोन्नतीचा प्रवर्ग** |
|---|---|---|
| १ | श्रीम.पाठक अनघा अविनाश | ज्येष्ठतेनुसार |
| २ | श्री.जावरानी मनोहर टेकचंद | ज्येष्ठतेनुसार |

सबब, उपरोक्त **उप अधिकारी** यांना **एस - २३ वेतनश्रेणी ६७७०० -२०८७००** मध्ये **'कार्यकारी अभियंता (स्था)'** पदावर, पदोन्नती मधील आरक्षण रद्द करण्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन व शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ चे अधिन राहून सेवाज्येष्ठतेनुसार रिक्त जागेवर निव्वळ

तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ६४ विषय क्रमांक - ०२

दिनांक - १८/१०/२०२१

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.अनुराधा गोफणे

संदर्भ - मा.सुजाता पालांडे व मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

म.न.पा.चे प्रभाग क्र.२८ पिंपळे सौदागर येथील पवनानदीकाठी कचरा संकलन केंद्र विकसीत करणे (नि.नो.क्र.३३/०६/२०१९-२० व निविदा र.रु.६२,३३,७०१/-) चे कामाचे आदेश ठेकेदार मे.अनुष एंटरप्रायझेस यांना दि.०६/०१/२०२० रोजी देणेत आलेले असून कामाची मुदत १२ महिने म्हणजेच दि.०५/०१/२०२१ अखेर पर्यंत होती. तदनंतर मा.सह शहर अभियंता यांचेकडील मान्य प्रस्तावानुसार दि.०५/०८/२०२१ पर्यंत भाववाढ फरकासह मुदतवाढ देणेत आली. सदर कामातून मौजे पिंपळे सौदागर येथे पवना नदीकाठी कचरा संकलन केंद्र विकसीत करणेचे काम पुर्ण करणेत आलेले असून ठेकेदार यांना सदर कामापोटी र.रू.२३,५८,६६०/- इतक्या रक्कमेचे बिल अदा करणेत आलेले आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र.६१४१, दि.१८/१२/२०१९ नुसार सदर कामासाठी र.रू.४३,९१,७७१/- इतके खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे मुळ खर्चाच्या रक्कमेतून म्हणजेच र.रू.४३,९१,७७१/- झालेल्या कामाचे बिल र.रू.२३,५८,६६०/- वजा जाता र.रू.२०,३३,१११/- इतकी रक्कम शिल्लक राहत आहे. त्यामुळे सदर प्रभागातील मा.नगरसदस्य यांनी त्याच प्रभागातील मौजे पिंपळे सौदागर येथील आरक्षण क्र.३६७ अ खेळाचे मैदान या आरक्षणामध्ये विषयांकित कामाच्या शिल्लक राहिलेल्या रक्कमेतून स्वच्छतागृह बांधून मिळणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेबाबतची मागणी या विभागाकडे केलेली आहे. त्याकरीता विषयांकित कामाची मुदत दि.०५/०८/२०२१ रोजी संपुष्टात आली असल्याने सदर कामास मुदतवाढ घेऊन मा.नगरसदस्य यांचे मागणीनुसार सदरची कामे करणे आवश्यक आहे. तरी प्रभाग क्र.२८ पिंपळे सौदागर येथील पवनानदीकाठी कचरा संकलन केंद्र विकसीत करणे (नि.नो.क्र.३३/०६/२०१९-२०) या कामातून त्याच प्रभागातील आरक्षण क्र.३६७अ खेळाचे मैदान येथे स्वच्छतागृह बांधणे व इतर

आवश्यक स्थापत्य विषयक कामे करणेच्या स्थळ बदलाबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( स्वीनल कपिल म्हेत्रे )**
**सभापती-**विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/४८७/२०२१
दिनांक : १८/१०/२०२१

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.